# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - १८
## सभावृत्तांत

दिनांक - ७.८.२०१२ वेळ - दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक ७.८.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
२) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
३) मा.छाया जगन्नाथ साबळे
४) मा.जम सोनाली पोपट
५) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
६) मा.पाडाळे निता विलास
७) मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
८) मा.भोसले राहुल हनुमंतराव
९) मा.चोंधे आरती सुरेश
१०) मा.भालेकर अरुणा दिलीप
११) मा.अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील
१२) मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

याशिवाय मा.कारचे, मा.बंब, मा.कुलकर्णी - सहा. आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.जाधव - शिक्षणाधिकारी, मा.देव - लेखाधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

( सभा भरवणेसाठी नेमलेल्या वेळी मा. सभापती सभागृहात उपस्थित नव्हते.)

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.अरुणा भालेकर

सभा भरवणेसाठी नेमलेल्या वेळी मा. सभापती सभागृहात उपस्थित नसल्याने मा. विनया तापकीर यांची सभेच्या अध्यक्षस्थानी निवड करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( मा. विनया तापकीर यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले )

----------

दिनांक ३१/७/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभाध्यक्ष यांनी प्रकट केले.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली

सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा. निता पाडाळे

.

दिनांक १/०८/२०१२ रोजी जंगली महाराज रस्ता पुणे येथे बॉम्ब स्फोट झाला असल्याने दहशतवादी प्रवृत्तीचा निषेध करुन मंगळवार दिनांक १४/०८/२०१२ रोजी दुपारी २.४५ वाजेपर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

मा.सभाध्यक्ष :- मंगळवार दिनांक - १४/०८/२०१२ रोजी दुपारी २.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( विनया प्रदिप (आबा) तापकीर)**
**सभाध्यक्ष**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १८
सभावृत्तांत
( दिनांक ७/८/२०१२ ची तहकुब सभा)

दिनांक - १४.८.२०१२ वेळ - दुपारी २:४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. स्थायी समितीची दिनांक ०७/०८/२०१२ ची तहकूब सभा मंगळवार दिनांक १४.८.२०१२ रोजी दुपारी २.४५ वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगदीश शेट्टी - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.जम सोनाली पोपट
७) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
८) मा.पाडाळे निता विलास
९) मा.जगताप नवनाथ दत्तु
१०) मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
११) मा.भोसले राहुल हनुमंतराव
१२) मा.चोंधे आरती सुरेश
१३) मा.भालेकर अरुणा दिलीप
१४) मा.अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील

याशिवाय मा.कदम-अति.आयुक्त,मा.सावंत-सहआयुक्त, मा.मुंढे, मा.कारचे, मा.ढेरे, मा.गावडे, मा.टेकाळे, मा.झुरे, मा.दुरगुडे, मा.बंब, मा.कुलकर्णी - सहा.आयुक्त, मा.घाडगे - मुख्यलेखापरिक्षक, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.कांबळे -प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना) मा.दुधेकर, मा.निकम, मा.चव्हाण, मा.जाधव, मा.कुदळे, मा.चिंचवडे, मा.जाधव, मा.कपिले, मा.साळवी, मा.पठाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.दांगट - कार्य.अभियंता, मा.जाधव - शिक्षणाधिकारी, मा.डॉ.गोरे - पशुवैद्यकिय अधिकारी, मा.चव्हाण - आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.साळवी - वैद्यकिय अधिकारी, मा.देशमुख-कायदा सल्लागार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

( मा.देशमुख - कायदा सल्लागार यांनी सभागृहास परिचय करुन दिला.)

ठराव क्रमांक - ८८०  विषय क्रमांक - १
दिनांक - १४/८/२०१२  विभाग - मध्यवर्ती साहित्य भांडार वैद्यकीय
सुचक :- मा.अविनाश टेकावडे  अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/५/कावि/४४०/१२ दि.१९/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या वाय.सी.एम.रूग्णालयाच्या लॉण्ड्री विभागातील उपकरणे / मशिनरीचा वापर करून लिनन (कपडे) धुलाईकामी निविदा प्रक्रियेचे कार्यवाही अंतिम टप्प्यात आली असून लवकरचा ई-निविदा नोटीस प्रसिध्द करण्यात येणार असल्यामुळे मे.सारा ट्रेडर्स प्रा.लि. यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना दिनांक ३१/८/२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यास व येणारे अंदाजे प्रतिमहा र.रू.९५,०००/- [र.रू.पंच्यान्नव हजार] अथवा प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८८१  विषय क्रमांक - २
दिनांक - १४/८/२०१२  विभाग - संगणक
सुचक :- मा.सुभद्रा ठोंबरे  अनुमोदक :- मा.आरती चोंधे
संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.संगणक /८/कावि/४२५/१२ दि.२६/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.Tech ९ Services यांना Content Management Cell करिताचे कामकाजाकरिता आदेशाचे तारखेपासून पुढील एक वर्ष कालावधीकरिता (दि.७/३/२०१२ ते ६/३/२०१३) र.रू. १,९३,५००/- इतक्या रकमेचे कामकाजाचे आदेश देण्यात आलेले असलेने सदरच्या कामकाजास व येणाऱ्या वार्षिक र.रू. १,९३,५००/- [र.रू.एक लाख त्र्यान्नव हजार पाचशे] चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८८२  विषय क्रमांक - ३
दिनांक - १४/८/२०१२  विभाग - माध्यमिक शिक्षण
सुचक :- मा.सुषमा तनपुरे  अनुमोदक :- मा.नवनाथ जगताप
संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/५/कावि/१७३/१२ दि.२५/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांतील इ.४ थी, ७ वी व इ. ९ वी, १० वी च्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेबाबत विशेष मार्गदर्शन करणेकामी दि.३०/७/२०१२ रोजी शिक्षक प्रशिक्षण आयोजित करणेकामी आगाऊ र.रू.४२,०००/- [र.रू.बेचाळीस हजार] शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग श्री.जाधव विष्णू श्रीधर यांचे नावाने अदा करणेस तसेच सदरचा उत्तुंग आमुचे ध्येय या प्रोजेक्टच्या वर्षभराच्या एकूण अंदाजे खर्च र.रू. १५,१०,०००/- च्या खर्चास, तसेच सदरच्या प्रोजेक्टकरीता वेळोवेळी लागणाऱ्या आगाऊ रक्कमा अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ८८३ विषय क्रमांक - ४
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - स्थापत्य
सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक :- मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/१६/१२दि.३१/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/२०१२-१३ मधील अ.क्र.८६ अन्वये, वॉर्ड क्र.१२ चऱ्होली येथील स्मशानभुमी जवळ घाट बांधणेकामी मे.एस.बी.सवई (नि.र.रू.३७,१५,३५४/- [र.रू. सदोतीस लाख पंधरा हजार तीनशे चोपन्न] पेक्षा ११.१२ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू. ३४,६७,३१७/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८८४ विषय क्रमांक - ५
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - वाहनदुरुती कार्यशाळा
सुचक :- मा.अविनाश टेकावडे अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.काशा/५/कावि/३६१/१२दि.२/८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण रुग्णालयाचे वापराकरीता मा.गजानन बाबर खासदार निधीमधून जिल्हा शल्य चिकिस्ता रुग्णालय औंध यांचेकडून मिळालेल्या रुग्णवाहीका क्र. MH १४ CW ०५५१ चे देखभाल दुरुस्ती व इतर अनुषंगीक कामे पिंपरी चिंचवड महापालिकेकडून करणेस व त्याकामी येणारे खर्चास तसेच यापुर्वी पोलीस खात्याकडून पिंपरी चिंचवड मनपाकडील अतिक्रमण विभागाचे वापराकरीता मिळालेल्या वाहनांची देखभाल दुरुस्ती कामासाठी, इतर अनुषंगीक कामाकरीता झालेल्या खर्चास तसेच भविष्यात अशा प्रकारच्या वापरामध्ये येणाऱ्या वाहनांच्या तत्सम खर्चास, तसेच भविष्यात मनपाचे वापराकरीता मिळणाऱ्या अशा प्रकारच्या वाहनांचे देखभाल दुरुस्ती व इतर अनुषंगीक कामाकरीता येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८८५ विषय क्रमांक - ६
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - वाहनदुरुती कार्यशाळा
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.काशा/५/कावि/६९९/१२दि.२/८/२०१२
विषय :- वैद्यकिय विभागाकरीता पाच नग रुग्णवाहिका खरेदी करणेबाबत..

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**(जगदीश शेट्टी )**
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/१०८७/२०१२
दिनांक - १६/८/२०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.